# कॅम्पसवरील ओस पडलेले विभाग पुन्हा बहरणार

## कुलगुरू डॉ. कामत : सात नवे उद्योगाभिमुख अभ्यासक्रम; 'सकाळ'च्या वृत्तमालिकेनंतर कार्यवाही

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १४ : कॅम्पसवरील घटत्या विद्यार्थी संख्येच्या गंभीर समस्येवर शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने निर्णायक पावले उचलली आहेत. त्यात उद्योगाभिमुख नवीन अभ्यासक्रमांची सुरुवात, अभ्यासक्रमांची पुनर्रचना आणि उद्योग-शिक्षण भागीदारीवर आधारित व्यापक कृती आराखडा राबविण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळे आगामी काळात कॅम्पसवरील ओस पडलेल्या अधिविभागांतील वर्ग पुन्हा विद्यार्थ्यांनी गजबजतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी व्यक्त केला.**



डॉ. आर. के. कामत

कॅम्पसवरील घटती विद्यार्थी संख्या आणि त्याचा एकूणच विद्यापीठावर होणारा परिणाम याबाबतचे वास्तव 'सकाळ'ने वृत्तमालिकेच्या माध्यमातून मांडले. त्याची विद्यापीठाने सकारात्मक दखल घेऊन वेगाने कार्यवाही सुरू केल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी 'सकाळ'समवेत संवाद साधताना सांगितले. घटती विद्यार्थी संख्या, रिक्त जागा आणि पदव्युत्तर, पीएच.डी. अभ्यासक्रमांना मिळणारा अल्प प्रतिसाद, या समस्या सोडविण्याबाबतची विद्यापीठाची भविष्यातील वाटचाल



त्यांनी मांडली.

सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर 'प्रशिक्षणसंलग्न पदवी अभ्यासक्रम (एईडीपी)' योजनेंतर्गत सात नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यामध्ये जैवरसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, सायबर सुरक्षा व डिजिटल न्यायवैद्यकशास्त्र, डिजिटल विपणन व कृत्रिम बुद्धिमत्ता, वित्तीय/भांडवली बाजारपेठ, अर्धसंवाहक (सेमी कंडक्टर) शास्त्र व तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता व स्वायत्त प्रणाली या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमांच्या अंमलबजावणीचा वेगही लक्षणीय राहिला. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने ६ जुलैला परीक्षा शुल्क निश्चित करून ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ च्या परीक्षांचे नियोजन सुरू केले. अल्पावधीत अभ्यासक्रम मंजुरी, शुल्करचना, प्रवेश प्रक्रिया आणि परीक्षा नियोजन पूर्ण केल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

### रोजगार बाजारपेठेचा अभ्यास

नवीन अभ्यासक्रम निश्चित करताना केवळ नावीन्याचा विचार न करता उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष मागणीचा अभ्यास केला आहे. या सर्व अभ्यासक्रमांमध्ये उद्योगसंलग्न प्रशिक्षणाचा समावेश केला असून, विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच प्रत्यक्ष कार्यानुभव मिळणार आहे. त्यामुळे रोजगारक्षमतेत वाढ होण्याची अपेक्षा आहे. उदयोन्मुख ज्ञानशाखांमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.

### सांविधिक मंडळांची गतिमान भूमिका

■ अभ्यासक्रम मंजुरीची प्रक्रिया विक्रमी वेगाने पूर्ण करण्यात विद्यापीठाच्या सांविधिक मंडळांची महत्त्वाची भूमिका राहिली. अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशीनंतर विद्या परिषद आणि व्यवस्थापन परिषद यांनी विहित प्रक्रियेनुसार प्रस्तावांची छाननी करून अल्पावधीत मंजुरी दिली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या समन्वयातून सर्व प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण झाल्या. विद्यापीठातील निर्णय प्रक्रियेची गती आता वाढविली असल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी स्पष्ट केले.

> विद्यार्थीसंख्या घटण्याची कारणे आम्ही नाकारत नाही. ही वस्तुस्थिती स्वीकारून त्यावर गतिमान उपाययोजना करणे हीच आमची जबाबदारी आहे. उद्योग-शिक्षण भागीदारीतून आधुनिक ज्ञानशाखा विद्यार्थ्यांसाठी खुल्या करीत आहोत. या अभ्यासक्रमांना विद्यार्थी, पालक आणि उद्योगक्षेत्राकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे. येत्या काळात कॅम्पसवरील अधिविभाग पुन्हा विद्यार्थ्यांनी गजबजतील, असा मला विश्वास आहे.
>
> **- डॉ. आर. के. कामत, कुलगुरू**

### पुढील टप्प्यात आणखी उपक्रम

■ प्रवेशसंख्येतील घट ही केवळ एका अधिविभागाची समस्या नसून, संपूर्ण उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीचा परिणाम आहे. त्यासाठी अभ्यासक्रम पुनर्रचना, उद्योग भागीदारी आणि आत्मपरीक्षण या त्रिसूत्रींवर आधारित व्यापक आराखडा तयार केला आहे. कौशल्य विकास केंद्रे, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम, प्राध्यापक-विद्यार्थी संवाद वाढविणारे उपक्रम, विद्यार्थीभिमुख सुविधा याबाबत लवकरच नव्या निर्णयांची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी आवर्जून सांगितले.

### कारणे समजली, दिशा ठरविली

■ कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर काही दिवसांतच 'सकाळ'ने माझ्यासमोर घटत्या विद्यार्थी संख्येचा मुद्दा सविस्तरपणे मांडला. त्यावर विद्यापीठ अधिविभागांतील अभ्यासक्रमांचा सर्वंकष आढावा घेतल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले. पारंपरिक चौकटीत अडकलेले, उद्योग व रोजगाराच्या बदलत्या गरजांशी विसंगत ठरलेले अभ्यासक्रम, कालबाह्य अभ्यासक्रम रचना आणि प्राध्यापक-विद्यार्थी 'कनेक्ट'चा अभाव ही विद्यार्थी संख्या घटण्यामागील प्रमुख कारणे असल्याचे माझ्या निदर्शनास आले. त्यानंतर विद्यार्थी संख्या वाढविण्याच्या दृष्टीने तातडीने ठोस दिशा निश्चित करून कार्यवाही सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JUL 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठाचा इन्फ्राप्लान समुहासमवेत सामंजस्य करार

## जलविद्याविषयक संशोधनाला गती मिळणार

**कोल्हापूर : (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

जलसंपदाविषयक पायाभूत अभियांत्रिकी सुविधा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या इन्फ्राप्लान समुहासमवेत शिवाजी विद्यापीठाने नुकताच सामंजस्य करार केला. संशोधन, कौशल्य विकास व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देश करारामागे असून आधुनिक संशोधनाच्या दृष्टीने दोन्ही संस्थांमध्ये ज्ञान, तंत्रज्ञान व अनुभवांचे आदानप्रदान होऊन विद्यार्थी, संशोधक आणि उद्योग क्षेत्रासाठी नव्या संधी उपलब्ध होतील.

इन्फ्राप्लान समूह गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ जलसंपदा व पायाभूत सुविधा क्षेत्रात विशेष अभियांत्रिकी सेवा प्रदान करत आहे. समूहामध्ये इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि., सिग्मा इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग प्रा. लि. तसेच इन्फ्राप्लान हायड्रॉलिक लॅबोरेटरी यांचा समावेश आहे. विद्यापीठातील भूगोल अधिविभाग आणि हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्रामध्ये जलविद्याविषयक संशोधन सुरू असून या



संशोधनाला उद्योग क्षेत्राची जोड मिळण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरणार आहे.

या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण, लाईव्ह इंडस्ट्री प्रोजेक्ट्स, संयुक्त संशोधन, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्टअप्स, पेटंट विकास तसेच विविध सरकारी संशोधन प्रकल्पांमध्ये सहकार्याची संधी मिळणार आहे. उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना देणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार असल्याचे यावेळी भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी सांगितले.

सामंजस्य करारावर कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि इन्फ्राप्लान समुहाचे संचालक आशिष अभय दोशी यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. गणेश न्हिवेकर आणि डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठाचा इन्फ्राप्लान समूहासमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर :** जलसंपदाविषयक पायाभूत अभियांत्रिकी सुविधा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या इन्फ्राप्लान समूहासमवेत शिवाजी विद्यापीठाने नुकताच सामंजस्य करार केला. संशोधन, कौशल्य विकास व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्याचा उद्देश करारामागे असून, आधुनिक संशोधनाच्या दृष्टीने दोन्ही संस्थांमध्ये ज्ञान, तंत्रज्ञान व अनुभवांचे आदान-प्रदान होऊन विद्यार्थी, संशोधक आणि उद्योग क्षेत्रासाठी नव्या संधी उपलब्ध होतील.

इन्फ्राप्लान समूह गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ जलसंपदा व पायाभूत सुविधा क्षेत्रात विशेष अभियांत्रिकी सेवा प्रदान करत आहे. समूहामध्ये इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि., सिग्मा इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग प्रा. लि. तसेच इन्फ्राप्लान हायड्रॉलिक लॅबोरेटरी यांचा समावेश आहे. विद्यापीठातील भूगोल अधिविभाग आणि हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्रामध्ये जलविद्याविषयक संशोधन सुरू असून, या संशोधनाला उद्योग क्षेत्राची जोड मिळण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरणार आहे. या सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण, लाईव्ह इंडस्ट्री प्रोजेक्टस्, संयुक्त संशोधन, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्टअप्स, पेटंट विकास तसेच विविध सरकारी संशोधन प्रकल्पांमध्ये सहकार्याची संधी मिळणार आहे. उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना देणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार असल्याचे यावेळी भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी सांगितले.

सामंजस्य करारावर कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि इन्फ्राप्लान समूहाचे संचालक आशिष अभय दोशी यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. गणेश न्हिवेकर आणि डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठाचा 'स्तुती' प्रकल्प 'व्हेरी गुड'

**कोल्हापूर :** भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या अर्थसाहाय्याने शिवाजी विद्यापीठात राबवण्यात आलेला 'स्तुती' प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण झाला. या प्रकल्पांतर्गत उल्लेखनीय कार्याची विशेष दखल घेऊन भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून संपूर्ण निधी मंजूर केला आहे. अंतिम टप्प्यातील ३८ लाख ३६ हजार ९४५ रुपयांचा निधी विद्यापीठाला प्राप्त झाला असून, एकूण २ कोटी १८ लाख ५५ हजार ४८४ रुपये खर्चाचा हा प्रकल्प अधिकृतपणे पूर्ण केला आहे.

या प्रकल्पांतर्गत देशभरातील संशोधकांना अत्याधुनिक उपकरणांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे आणि या सुविधांचा पारदर्शक वापर सुनिश्चित करणे यावर विशेष भर दिला. संपूर्ण देशभरात एकूण २२ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. यापैकी ४ कार्यक्रम शिवाजी विद्यापीठात झाले होते. यामध्ये विविध राज्यांमधील १०५० संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रकल्पाचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांना अत्याधुनिक उपकरणांवर व्याख्याने देण्यासाठी निमंत्रित केले होते.

या प्रकल्पाचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे, उपसमन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. किरण पवार यांनी समर्थपणे धुरा सांभाळली. सहयोगी डॉ. मकसूद वाईकर, अजित कांबळे, विजया इंगळे, आदिती गर्गे, सुप्रिया साठे आणि गायत्री पवार या सदस्यांनी योगदान दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2026
तरूण भारत

# यशस्वी व्हायचयं तर, 'एआय'चा वापर करा

- शिवाजी विद्यापीठाचे डॉ. कृष्णा पाटील यांचे वकिलांना आवाहन
- शहाजी लॉ कॉलेजात एआयवर आधारित कार्यशाळा

**प्रतिनिधी**, कोल्हापूर

वकिलीच्या क्षेत्रात एआयचा (कृत्रिम बुद्धिमत्ता) कौशल्याने वापर करता येऊ शकतो. जे वकील व्यवसायात एआयचा वापर करतील ते यशस्वी वकिल म्हणून नावारुपाला येऊ शकतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या सीडीओईचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

शहाजी लॉ कॉलेजमध्ये कायदा व्यवसायातील कृत्रिम बुद्धिमत्ता संधी, आव्हाने आणि भविष्य या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनपर कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम हे होते. दिवसभर सुरु राहिलेल्या कार्यशाळेत कायदा क्षेत्रातील तज्ज्ञ, विधिज्ञ, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी होते.

डॉ. पाटील व डॉ. मगदुम यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून कार्यशाळेला सुरुवात केली. यानंतर कार्यशाळा समन्वयक यांनी डॉ. सुचिता सुरगिहळळी कार्यशाळा आयोजित करण्यामागील पार्श्वभूमी सांगितली. यानंतर डॉ. मगदूम यांनी सध्या झपाट्याने बदलत चाललेल्या काळात कायदा व्यवसायात एआय का वापरावे लागेल याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. याचबरोबर शहाजी विधी महाविद्यालयातर्फे आगामी काळात सुरु केल्या जाणाऱ्या सर्टिफिकेट कोर्स इन एआय या अभ्यासक्रमांची माहिती सांगितली.

यानंतर सुरु केलेल्या पहिल्या सत्रात आंतरराष्ट्रीय संबंध अधिकारी व पुण्यातील एमएमएसएससी लॉ कॉलेजचे प्रा. डॉ. सौरभ व्ही. सी. उबाळे यांनी एआयचा नीट वापर केल्यास प्रभावीपणे वकिली करणे सोपे जाईल, असेही सांगितले. दुसऱ्या तांत्रिक सत्रात सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षक व विधी सल्लागार ॲड. रविराज बिरजे यांनी एआय-सहाय्यित कायदेविषयक व्यवसाय : चुका गंभीर समस्या बनण्यापूर्वी त्यांचे निदान या विषयावर मार्गदर्शन केले.

कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशासन तज्ज्ञ ॲड. डॉ. बंगाली यांनी कायदे व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग : संधी आणि आव्हाने या विषयावर मार्गदर्शन केले. विविध सत्रांमध्ये डॉ. अस्मिता पाटील, प्रा. सादिया मुल्ला व प्रा. श्रुती यज्ञोपवित यांनी सुत्रसंचालन केले.प्रा. कल्याणी पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2026
तरूण भारत

# दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण प्रवेशासाठी मुदतवाढ

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठीच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ दिली आहे. पुढील महिन्यातील १० ऑगस्टपर्यंत प्रवेश प्रक्रीया सुरु असणार आहे, अशी माहिती केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली आहे.

नोकरी करणारे कर्मचारी, गृहिणी, उद्योजक, शेतकरी, सैनिक, कामगार तसेच बारावी उत्तीर्ण विद्यार्थी–विद्यार्थींना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. त्यांसाठी केंद्राच्या ८९ अभ्यास केंद्रांमार्फत प्रवेशाची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. इच्छुकांनी शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत **https://www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळाला भेट देऊन द्यावी. याचबरोबर **https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg** ऑनलाईन प्रवेश पोर्टलशी संपर्क साधून आपला प्रवेशही निश्चित करावा.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाही नियमानुसार दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन दुहेरी पदवी (**Dual Degree**) घेता येणार आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन डॉ. पाटील यांनी केले आहे.

## विविध आठ अभ्यासक्रमांना प्रवेश मिळणार

**केंद्राअंतर्गत बीए, बीकॉम, एमए (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एमकॉम आणि एमएस्सी (गणित) या दूरशिक्षण या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जात आहे. तसेच ऑनलाईन एमबीए, एमकॉम आणि एमएस्सी (गणित) या अभ्यासक्रमांसाठी संबंधीत विद्यार्थी–विद्यार्थींना प्रवेश मिळवता येणार आहे, असेही डॉ. पाटील यांनी सांगितले आहे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशास मुदतवाढ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठीच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस दि. १० ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

या अंतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण (Distance Mode) अभ्यासक्रमांसह ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत.

डॉ. पाटील यांनी सांगितले की, विविध कारणांमुळे नियमित शिक्षण घेता न आलेले विद्यार्थी, शिक्षण अर्धवट राहिलेले विद्यार्थी, नोकरी करणारे कर्मचारी, गृहिणी, उद्योजक, शेतकरी, सैनिक, कामगार तसेच बारावी उत्तीर्ण विद्यार्थी यांच्यासाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अभ्यासक्रम एक उत्तम संधी उपलब्ध करून देतात. केंद्राच्या ८९ अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://www.unishivaji.ac.in प्रवेशासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध आहे. तसेच ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg जाऊन आपला प्रवेश निश्चित करू शकतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाही नियमानुसार दुहेरी पदवी (Dual Degree) घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयाशी किंवा जवळच्या अधिकृत अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

15 JUL 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# उपकुलसचिव निवास माने यांना पीएच.डी.

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :



शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. निवास यशोदा संभाजी माने यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र विषयांतर्गत 'उच्च शिक्षण संस्थांमधील संगणकीकरण आणि ईआरपी प्रणालींची प्रभावी अंमलबजावणी' या विषयावर डॉ. चिंतामणी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला.

निवास माने हे प्रामाणिक, शिस्तप्रिय आणि कार्यक्षम अधिकारी म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या संगणकीकरण प्रक्रियेत उल्लेखनीय योगदान दिले आहे. प्रशासन व परीक्षा विभागातील अनेक संगणक प्रणालींच्या विकासामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, ओपीडीसी (OPDC), शिव दीक्षांत (Shiv Dikshant) आणि एसआरपीडी (SRPD) यांसारख्या प्रणालींच्या निर्मिती व अंमलबजावणीत त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. या प्रणालींमुळे विद्यापीठातील कामकाज अधिक गतिमान झाले असून वेळ, श्रम आणि निधी यांची मोठी बचत झाली आहे.

त्यांना संशोधन कार्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. केदार मारूलकर तसेच परीक्षा संचालक डॉ. अजित जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2026
पुण्यनगरी

# उपकुलसचिव निवास माने यांना पीएच.डी.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. निवास



माने यांना पीएच.डी. पदवी जाहीर झाली आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र विषयांतर्गत 'उच्च शिक्षण संस्थांमधील संगणकीकरण आणि ईआरपी प्रणालींची प्रभावी अंमलबजावणी' या विषयावर डॉ. चिंतामणी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शोधप्रबंध सादर केला. त्यांना संशोधन कार्यासाठी कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. केदार मारूलकर, परीक्षा संचालक डॉ. अजित जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.